## प्रकरण ६ वे

## // निष्कर्ष व शिफारशी //

( CONCLUSION AND RECOMMENDATION )

## -: प्रकरण ६ वे :-

## - निष्कर्ष व शिफारशी -

या पूर्वीच्या म्हणजे ५ व्या प्रकरणामध्ये संशोधकाने प्रश्नावली मधून प्राप्त झालेल्या माहितीचे पृथक्करण, विश्लेषीकरण व सारणीकरण केलेले आहे. त्याच बरोबर निष्कर्ष काढण्यासाठी सोयीचे व्हावे म्हणून माहितीचे वर्गीकरण केले आहे. परंतु या सर्व मांडणीवरून जर काही निष्कर्ष काढता येत नसतील व काही अर्थ बोध होत नसेल तर हा सर्व प्रबंध व्यर्थ होय. म्हणून संकलित केलेल्या माहिती वरून निष्कर्ष काढणे ही संशोधन कार्यातील अत्यंत महत्वाची पायरी होय. किंबहुना संशोधनाचा निष्कर्ष हा आत्माच होय असे म्हणावे लागेल.

या प्रकरणाचा उद्देश प्रामुख्याने उपलब्ध झालेल्या माहितीवरून निष्कर्ष काढणे, प्रचलित असलेल्या अभ्यासक्रमाची योग्यता-योग्यता ठरविणे, तिचा पुरे-अपुरेपणा ठरविणे व त्यावरून आढळणी व अपुरेपणावर व उणीवावर मात करण्यासाठी उपाय सूचविणे हा आहे.

[१] शहरातील एकूण १६ शाळा पैकी १२ शाळानांच शारीरिक शिक्षक आहेत. म्हणजेच ४ शाळांना शारीरिक शिक्षणाचे शिक्षकच नाहीत. शिक्षकांच्या वेतनाची सोय शासनानी केलेली असतांना तसेच शारीरिक शिक्षकांची उपलब्धता भरपूर प्रमाणात असतांना या ४ शाळांनी शारीरिक शिक्षकाच्या नेमणूका का करू नयेत ही एक आश्चर्याची बाब आहे.

ह्या चार शाळा विना अनुदान तत्वावरील असल्याने बहुदा या शाळांनी शारीरिक शिक्षक नेमले नसावेत असे वाटते. तथापी या शाळामध्ये अन्य विषयाचे शिक्षक आहेत. व अन्य विषय शिक्षका-इतकेच वेतन शारीरिक शिक्षकासही असल्याने या विनाअनुदान संस्थानी शारीरिक शिक्षक का नेमू नयेत, असा प्रश्न पडतो. ही परिस्थिती शारीरिक शिक्षणाचा उद्दिष्टे साध्य होण्याच्या दृष्टीने चांगली नाही. शाळा विना अनुदान असून किंवा अनुदानित असून शाळेस शारीरिक शिक्षक असायलाच हवा. याची खबरदारी शाळा चालकांनी व तसेच शासनाने घ्यायला हवी. तेंव्हा तर अशा नवीन शाळा पुढे चालू ठेवण्यास परवानगी देताना शारीरिक शिक्षकांची नेमणूक ही अट शासनाने घालायला हवी.

[२] परळी शहरातील एकूण विद्यार्थ्यांची संख्या १०,३०६ आहे या विद्यार्थ्यांकरीता एकूण शारीरिक शिक्षण देणारे शिक्षक फक्त १४ आहेत. विद्यार्थ्यांचे शिक्षकाशी प्रमाण पाहता हे ७३६ विद्यार्थ्यांस एक शिक्षक असे पडते. ही अतिशय अपुरी व तुटपुंजी सोय होय. एकीकडे शासन परिपत्रके काढून २५० विद्यार्थ्यांस एक शारीरिक शिक्षक असावा असे म्हणते. तर दुसरीकडे ७३६ मुलास एक शिक्षक ही वस्तुस्थिती. उक्ती व कृती या मध्ये हे महद अंतर का पडावे हा मोठा कठीण प्रश्न आहे.

या शिक्षकाच्या अपूरेपणाचे कारण शाळाचालकांनी शारीरिक शिक्षणास दिलेले कमी महत्व होय.

शालेय जगतात इंग्रजी, शास्त्र, गणित इत्यादी विषय जास्त महत्वाचे व अन्य काही विषय कमी महत्वाचे असे समजले जाते.

अन्य कमी महत्वाच्या विषयाच्या यादीत शारीरिक शिक्षण मोडते ही खेदाची बाब होय. विद्यार्थ्यांच्या व्यक्तीमत्वाच्या सर्वांगीण विकासात शारीरिक विकास हे महत्वाचे क्षेत्र होय या साठी शारीरिक शिक्षणात कमी लेखले जावू नये आणि म्हणून असे सुचवावेसे वाटते की, कोणत्याही परिस्थितीत शारीरिक शिक्षकाच्या नेमणुका दर २५० विद्यार्थ्यांच्या मागे एक शिक्षक अशा काटेकोरपणाने व्हाव्यात.

[३] शारीरिक शिक्षणाच्या संदर्भात मुलगा व मुलगी या मध्ये प्राथमिक शिक्षण स्तारापर्यंत जरी फारसा भेद नसला तरी माध्यमिक स्तारावर असा भेद अवश्य केला पाहिजे. माध्यमिक स्तारावर इतर सर्व शिक्षण मुला-मुलींच्या दृष्टीने सहशिक्षणास जरी योग्य असले तरी शारीरिक शिक्षणाबाबत मुलगा व मुलगी यामध्ये भेद केला पाहिजे.

माध्यमिक शाळामध्ये साधारणपणे १० ते १८ या वयोगटाचे मुले व मुली शिकत असतात. शरीरशास्त्राच्या दृष्टी-कोणातुन १० ते १८ या वयोगटातील मुलगा व मुलगी या दोहोंमध्ये कमालीचा फरक आढळतो. शरीराचा आकार, वजन, उंची, शक्ती, चापल्य, स्नायू व अवयवावरील ताबा तसेच स्पर्धात्मक वृत्ती इत्यादी बाबत या वयोगटातील मुलगा व मुलगी या दोहोंमध्ये बराच फरक आढळून येतो. म्हणून मुली करीता जरी इतर सर्व विषय वेगळे नसले तरी शारीरिक शिक्षण हे वेगळ्या स्वरुपाचे व स्तराचे असायला हवे. मुलींकरीता व मुलांकरीता वेगवेगळे सांघीक व वैयक्तीक खेळाचे

प्रकार असायला हवेत. त्या त्या क्षेत्रामधील नैपुण्याचा स्तर मुलामुलींच्या बाबतीत वेगवेगळा असायला हवा. ही बाब काही नव्याने व वेगळेपणाने मांडायला हवी असे नाही.

शहरातील एकूण माध्यामिक स्तरावरील मुलींची संख्या २,१६८ आहे. या पैकी मुली करीता खास असणा-या दोन शाळामधून २१९ मुली शिकतात. या ८१९ मुली करीता केवळ एकच स्त्री शिक्षिका आहे. हे प्रमाण अतिशय तुटपुंजे आहे हे सांगण्याची गरज नाही. १,५४९ मुली मुलांच्या शाळेत शिकतात. या मुली करीता स्त्री शिक्षिका एकही नाही. विशेष आश्चर्याची बाब म्हणजे स्वतंत्र मुलींच्या साठी असलेल्या शाळामध्ये ही स्त्री शिक्षिका ऐवजी पुरुष शिक्षक आहेत. शारीरिक शिक्षणाच्या बाबतीमध्ये मुलींचे शारीरिक शिक्षण पुरुष शिक्षक देवू शकणारच नाहीतअसे संशोधकाचे मत नाही तथापी पुरुष शिक्षकापेक्षा अधिक तन्मयतेने, आवडीने व योग्य प्रकाराने स्त्री शिक्षिका मुलींना शारीरिक शिक्षण देवू शकतात. हे निर्विवाद आहे. आणि म्हणून असे सुचवावेसे वाटते की, कोणत्याही परिस्थितीत मुलींच्या शाळामध्ये पुरुष शारीरिक शिक्षक नेमले जावू नयेत.

मुलांचा मोठ्या शाळामधून मुलीसाठी एकेक स्वतंत्र वर्ग पाडले जातात. ही बाब स्वागतार्हय होय या वर्गवारीमागे असणारा हेतू मुलीसाठी काही वेगळे शिक्षण असावे हाच होय परंतु अशा शाळामधून मात्र पुरुष शिक्षकच शारीरिक शिक्षण देतात. यावरून असे सुचवावेसे वाटते की, मुला मुलीकरीता असलेल्या मिश्र शाळामध्ये किमान एकातरी स्त्री शिक्षिकेची नेमणूक केली जावी. असे केल्याने २५० विद्यार्थ्यामागे एक शिक्षक हे प्रमाणही साधले जाण्यास मदत होईल.

[४] केवळ इतर शिक्षणाच्या दृष्टीनेच नव्हे तर शारीरिक शिक्षणाच्या दृष्टीनेही शाळा दाट लोकवस्ती, गर्दी गोंगाट बाजार इत्यादीपासून दूर असावयास हव्यात. शाळा दाटलोकवस्तीत असल्याने कोणत्याही परिस्थितीत खेळास हवे असलेले मोठे क्रीडांगण उपलब्ध होऊ शकत नाही. तसेच मोकळी हवा व भरपूर प्रकाश इत्यादी बाबीही उपलब्ध होऊ शकत नाहीत. म्हणून असलेल्या शाळा ह्या दाट लोकवस्तीतून काढून त्या शहराबाहेर दूर न्याव्यात असे म्हणणे जरी व्यवहार्य नसले तरी या पुढे शाळांना परवानगी देताना दाट लोकवस्तीपासून दूर असणे या बाबीचा प्राधान्याने विचार शासनाने करायला हवा. वास्तविक पाहता शाळा सुरु करण्याच्या परवानगी अर्जा मध्ये "पुरेशा क्रीडांगणाची व्यवस्था" ही अट आहेच तथापी ती कागदावरच राहून जाते व क्रीडांगण नसलेल्या किंवा अपुरे असलेल्या संस्थानाही शाळा चालविण्यास परवानगी दिली जाते. ही खेदाची बाब होय. या बाबत नवीन काही सुचविण्याऐवजी आहे त्या नियमाचेच काटेकोरपणाने व कठोरपणाने पालन केले जावे असे म्हणावेसे वाटते.

[५] विनाअनुदानित व अनुदानित शाळा यामध्ये शारीरिक शिक्षणाच्या दृष्टीने काही भेद असू शकेल याची पुसटही कल्पना प्रारंभी संशोधकास नव्हती त्यामुळे विनाअनुदानीत अथवा अनुदानित असा स्वतंत्र दोन विभागामध्ये संशोधकाने जाणीवपूर्वक माहितीची पृच्छा केली नाही. तथापी संकलीत झालेल्या माहितीवरुन समग्रदृष्ट्या संशोधकास असा भेद करणे आगत्याचे वाटते. म्हणून तो तसा केलेला आहे.

शहरातील १४ शाळांपैकी ७ शाळा विनाअनुदानीत व ७ शाळा अनुदानित आहेत. शाळांची स्वतंत्र इमारत, क्रीडांगणाचा अपुरेपणा, क्रीडा साहित्याची उपलब्धता व काही प्रमाणात क्रीडा शिक्षकाची उपलब्धता इत्यादी बाबतीत या शाळामध्ये कमालीचा भेद आढळून आला आहे. विना अनुदानित शाळांना संस्थेच्या स्वतंत्र इमारतीची उणीव, क्रीडांगणाचा अपुरेपणा किंवा अजिबातच नसणे, क्रीडा साहित्य अतिशय तुटपुंजे असते. या सर्वसामान्य पूर्व कल्पनेस दुजोराच [बळकटीच] मिळतो. अर्थातच सदरहू ७ विनाअनुदानित शाळांना वरील सर्व बाबीची उणीव आहे.

या वरुन असे सुचवावेसे वाटते की, विनाअनुदानीत शाळांची मान्यता पुढे चालू ठेवताना वरील सर्व बाबींची उपलब्धता करुन तपासणी जावी.

संशोधकाचा तर असा अनुभव आहे की, एखादी शाळा सुरु करण्यास प्रारंभी परवानगी दिल्यावर कोणत्याही एका अथवा अनेक अटींची पूर्तता न झाल्याने एखाद्या शाळेची मान्यता स्थगीत केलेले अथवा काढून घेतलेले उदाहरण अजीबात नाही. आपल्याकडे या बाबीस आपल्या शासनाचे धोरण मोघमपणाचे व ढोबळ आहे. एकदा परवानगी दिल्यावर अशा शाळा विनाअट कशातरी चालू असतात व "कसेतरी चालते" ही बाब एक सर्वमान्य होऊन बसलेली आहे. खास करुन शारीरिक शिक्षणाच्या बाबतीतही शासनाचा हाच भोंगळपणा नडतो.

[४] वेळापत्रकात दर वर्गास दर आठवड्यास शारीरिक शिक्षणास किती तासीकांची सोय केलेली आहे या संदर्भात इयत्तावार

माहिती मागवून संकलीत केली. निष्कर्षाच्या दृष्टीने सोयीसाठी ५ ते ७ इयत्तांचा कनिष्ठ स्तर मानला. कनिष्ट स्तरावर सरासरीने दर आठवड्यास प्रत्येक वर्गास ३ तासीकांची सोय, तर वरिष्ठ वर्गास २ - ३ तासीकांची वेळापत्रकात सोय केलेली आहे.

वेळापत्रकात इतर विषयास व शारीरिक शिक्षणास उपलब्ध करुन दिलेल्या तासीकांची संख्या पाहता शारीरिक शिक्षणास किती कमी महत्व दिलेले आहे हे दिसून येईल. सर्व साधारणपणे इंग्रजीस कनिष्ट वर्गास ८ ते १० तासीका, वरच्या वर्गास ६ तासीका व त्या मागोमाग शास्त्र गणित इत्यादी विषयास भरपूर वेळ उपलब्ध करुन दिलेला आहे. केवळ शारीरिक शिक्षण या एकाच विषयास कनिष्ठ व वरिष्ठ स्तरास अनुक्रमे तीन व दोन तासीका देऊन शारीरिक शिक्षण या विषयास अगदी गौण स्थान दिले आहे.

संशोधकास स्पष्टपणे असे सुचवावेसे वाटते की, दर आठवड्यास प्रत्येक वर्गास मग तो कनिष्ठ स्तर असो किंवा वरिष्ठ स्तर असो किमान सहा तरी तासीका उपलब्ध करुन दिल्या पाहिजेत. प्रचलित वेळापत्रकामध्ये कनिष्ठ व वरिष्ठ स्तरावरील वर्गांना उपलब्ध करुन दिलेल्या किमान तासीकांच्या संख्येमागे भेद करण्याचे कोणते कारण आहे हेच कळत नाही. भेद करायचाच झाल्यास वरिष्ठ वर्गांना कनिष्ठ वर्गापेक्षा शारीरिक शिक्षणासाठी अधिक वेळ उपलब्ध करुन द्यायला हवा. तरच उत्तरो-तर वरच्या वर्गावर पडणारा बौध्दिक विषयाचा बोजा कमी होऊ शकेल.

वेळापत्रकात शारीरिक शिक्षणास उपलब्ध करुन दिलेल्या

हलीच्या तासीका अपु-या पडतात. व त्यामुळे शारीरिक शिक्षणाचा अभ्यासक्रम पुर्ण होत नाही. शारीरिक शिक्षणाचा अभ्यासक्रम पुर्ण करण्याच्या दृष्टीने वेळापत्रकाच्या वेळेव्यतिरिक्त तासीका घेउन अभ्यासक्रम पुर्ण करावा लागतो. पाहणीतील एकुण १६ शाळा पैकी ८ शाळातील शिक्षक असा जादा वेळ देउन अभ्यासक्रम पुर्ण करण्याचा प्रयत्न करतात. त्या मध्येही ४ शाळा प्रासंगिक [कधी-कधी] तासीका घेउन अभ्यासक्रम पुर्ण करतात. तर ८ शाळा आहे त्या वेळेतच अभ्यासक्रम कसाबसा संपवतात व मेळ घालतात. वेळापत्रकाशिवाय जादा तासिका घेणे या बाबीचा संबंध शिक्षकाच्या कार्यभाराशी येतो व हा शारीरिक शिक्षकास जादा असलेला कार्यभार होय.

सर्वसामान्यपणे या सर्व बाबीचा विचार करुन असे सुचवावेसे वाटते की, आठवड्यातुन प्रत्येक वर्गास किमान ६ तासीका शारीरिक शिक्षणास उपलब्ध करुन दिल्या जाव्यात.

[७] अध्यापनाच्या आरंभी अध्यापनाचे नियोजन करणे हे विद्यार्थ्यांच्या शिक्षकांच्या श्रमाच्या, वेळेच्या व खर्चाच्या बचतीच्या दृष्टीने महत्वाचे होय. व असे नियोजन प्रत्येक विषयशिक्षकाला वर्षारंभी करावेच लागते. तथापी १६ शाळामधील शिक्षकापैकी फक्त ८ शाळाचे शिक्षक असे नियोजन करतात. असे दिसुन आले. नियोजन न करण्याचे कारण कोणते का असेना पण नियोजन हे व्हायलाच हवे. कोणत्या क्रीडाप्रकारास, व्यायाम प्रकारास किती वेळ द्यावा, अध्यापनास व सरावास किती किती वेळ द्यावा इत्यादी बाबतचे नियोजन प्रारंभी व्हायलाच हवे. केव्हाही, कोणताही सुचेल तो खेळ घेणे अथवा "मॉनिटरीयल" पध्दतीचा अवलंब करणे हे केंव्हाही वाईटच. या बाबतीत शारीरिक शिक्षणाकडे शिक्षक पुरेशा गांभीर्याने

पहात नाहीत. अध्यापनाचे व सरावाचे नियोजन तर दूरच राहते. खेळाचा तास ही एक वेळ काढू बाब असा काही शिक्षकांचा समज दिसतो. शिक्षकानी हा आपला दृष्टीकोन बदलला पाहिजे.

[८] देशी व विदेशी खेळप्रकाराबाबत बहुतेक शाळा कब्बडी, खो-खो, इत्यादी देशी प्रकार प्रामुख्याने घेतांना दिसतात. त्यातल्या त्यात फारसा क्रीडासाहित्याची गरज लागणारं नाही असेच खेळ वारंवार घेतले जातात. तर फूटबॉल, हॉकी, व्हॉलीबॉल, इत्यादीसारखे जागतीक महत्व असलेल्या विदेशी खेळाकडे पूर्णपणे दुर्लक्ष केले जाते. संकलीत केलेल्या माहितीवरुन असा निष्कर्ष निघतो की, विदेशी खेळाचे साहित्य जवळजवळ सर्वच शाळामधून उपलब्ध नाही. त्यामुळे अशा खेळाबाबतचे शिक्षण विद्यार्थ्यांना मिळत नाही. त्यामुळे या खेळाच्या मैदानाचा प्रश्न उपस्थित होत नाही.

शासनाने अशा खेळ साहित्यासाठी भरपूर अनुदान उपलब्ध करुन द्यावे. हे अनुदान प्रत्यक्ष वस्तूच्या रुपाने दिले तरी चालेल. संशोधकाने प्रश्नावलीशिवाय शारीरिक शिक्षकांच्या अनौपचारीक मुलाखती घेतल्या सर्वांचा एकच सूर दिसून आला. "किंमती क्रीडा साहित्य उपलब्ध होत नाही." इत्यादी इत्यादी.

[९] "धावणे ह्या बाबीस साहित्याची गरज नसतानाही १६ पैकी केवळ तीनच शाळांना २०० व ४०० मिटरच्या धावण पथाची सोय आहे. बाकीच्या शेकडा ८२ % शाळांना ही सोय उपलब्ध नाही. ही आश्चर्याची बाब होय. यावरुन असा निष्कर्ष निघतो की, "सर्वसाधारणपणे अधिक सहाय्य उपलब्ध नसल्याने खेळ साहित्य

उपलब्ध होऊ शकत नाही, त्यामुळे असे खेळ घेता येत नाहीत" ही जी सबब वारंवार सांगितली जाते त्यात काही तथ्य नाही. कारण धावणपथ होऊ शकतील असे पुरेसे मैदान असूनही धावण पट्ट्या तयार केल्या गेलेल्या नाहीत अशा ५ शाळा आढळून आल्या.

यावरून "पुरेसी जागा उपलब्ध नाही म्हणून विशिष्ठ खेळ प्रकार घेता येत नाहीत" ही जी सबब सर्वसाधारणपणे सांगितली जाते त्यात काही तथ्य नाही. म्हणजे खेळाची सोय न होण्यास "तुटपुंजे आर्थिक सहाय्य व अपुरी जागा" ह्या सबबीशिवाय तिसरे किंवा अन्य कारण आहे. असे दिसून आले, आणि ते म्हणजे शिक्षकांचे कामाकडे दुर्लक्ष.

[१०] वैयक्तीक व सांघीक या प्रकारानुसार कोणत्या प्रकारचे क्रीडा प्रकार सर्व साधारणपणे घेतले जातात याची तुलना केली असता असे आढळून आले की, " साहित्य असो व नसो, वैयक्तीक क्रीडाप्रकाराकडे बहुतांशी दुर्लक्ष केले गेलेले आहे. याउलट अध्यापनामध्ये सांघिक खेळावर लक्ष केंद्रित झाले आहे. असे बहुतांशी आढळते. याचे उदाहरण म्हणून कुस्ती, मल्लखांब, आणि डबलबार हे देता येईल. हे वैयक्तिक क्रीडा प्रकार घेणाऱ्या शाळांची संख्या अगदी बोटावर मोजण्यासारखी आहे. ती म्हणजे २ ते ३ होय. याचे कारण कदाचित कुस्तीचा आखाडा उपलब्ध नाही हे असेल. कारण एकही शाळेत असा आखाडा उपलब्ध नाही.

"मैदान उपलब्ध नाही म्हणून विशिष्ट क्रिडा प्रकार घेतले जात नाहीत." या पारंपारीक सबबीलाही धक्का देणारी माहिती उपलब्ध झाली ही विशेष बाब होय. ते खेळ म्हणजे उंच उडी, लांब उडी, थाळी फेक, इत्यादी उंचउडीस विशिष्ट प्रकारचे मैदान अवश्यक असते. शहरातील १६ पैकी ११ शाळांना असे विशिष्ट तयार केलेले

मैदान नसूनही त्या सर्व ११ शाळा ज्यांच्याकडे अशी मैदाने आहेत त्या शाळाकडे जाऊन या खेळाचा सराव घेतात. तीच बाब थाळीफेक या क्रीडाप्रकाराबाबत दिसून आली. थाळीफेक हा क्रीडा प्रकार ९ शाळा घेतात. परंतु यापैकी ३ शाळांनाच अशी विशिष्ठ त-हेची मैदाने उपलब्ध आहेत. म्हणजे उरलेल्या ६ शाळा जेथे मैदान उपलब्ध होईल अशा ठिकाणी जाऊन हे खेळ प्रकार घेतात.

११] कॅरम व चेस [बुध्दीबळ] हे खेळ मनोरंजनाचे खेळ म्हणून त्यांचा समावेश अभ्यासक्रमात आहे. तथापी शहरातील १६ शाळापैकी फक्त ३ शाळा कॅरम घेतात व १ शाळा बुध्दीबळ हा क्रीडा प्रकार घेते. इतर शाळा हे क्रीडा प्रकार का घेत नाहीत याचे संभाव्य कारण असे असू शकेल की या खेळाच्या शालेय स्तरावर कुठेही स्पर्धा होत नाहीत. किंवा दुसरे संभाव्य कारण साहित्य उपलब्ध होऊ शकत नाही, हेही असू शकते. परंतु ज्या दोन शाळाकडे या खेळाचे साहित्य उपलब्ध आहे व खेळ घेतले जातात. त्या शाळा विना अनुदानित इंग्रजी माध्यमाच्या शाळा होत. यावरुन असा हो अंदाज करता येतो की, हा खेळ उच्चभ्रू समाजा करताच आहे. असा सर्वसामान्य समज असावा. नाहीतर बुध्दीबळासारख्या फारसा खर्च नसलेल्या व खास मैदानाची गरज नसलेल्या या क्रीडाप्रकाराकडे इतर शाळांनी दुर्लक्ष केले नसते.

[११] वास्तविक अध्यापनाखेरीज "स्पर्धेत उतरणे व जिंकणे" हे काही शारीरिक शिक्षणाच्या अध्यापनाचे उद्दिष्ट नाही. तथापी स्पर्धेत उतरणे व जिंकणे हे उद्दिष्ट गृहीत धरूनच शारीरिक शिक्षणाच्या अध्यापनाची वाटचाल बहुतेक शारीरिक शिक्षक करतात. कारण प्रश्नावलीत "शाळेतर्फे [ एक्स्ट्रा टाईम ] कोचिंगची व्यवस्था करण्यांत येते काय या होय/नाही अशा स्वरुपाच्या प्रश्नाला होकारार्थी उत्तर देणा-या

५ शाळा आढळून आल्या. स्पर्धेत उतरणे, स्पर्धा जिंकणे व याद्वारे व्यावसायीक प्राविण्य मिळविणे हे काही शारीरिक शिक्षणाच्या अध्यापनाचे उद्दिष्ट नसतांना ते अंगी बाणावे व ते उत्कृष्ठ साध्य व्हावे असा एकंदर समाजाचा दृष्टीकोन असावा यात शारीरिक शिक्षणाच्या अध्यापनाकडे चुकीच्या दृष्टीकोनातून पाहिले जाणे हा दोष उद्भवतो. अशा स्वरुपाच्या फाजील अपेक्षा शारीरिक शिक्षणाच्या अध्यापनाकडून केल्या जाऊ नयेत. हल्ली शासन माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांकरता तालुका, जिल्हा व राज्य स्तरावर अशा विविध स्पर्धा नियमितपणे आयोजित करीत असते. खरे पाहता शासनाने अशा विविध स्पर्धा एकतर आयोजित करायलाच नकोत नाही तर अशा स्पर्धांचे आयोजन करायचे असेल तर अशा स्पर्धकाची तयारी करण्यासाठी श्रम, वेळ व खर्च यांची कायदेशीर तरतूद शासनाने करायला हवी. या संबंधात [illegible] शासनाच्या प्रशासनातील फार मोठी विसंगती आढळते. अशा स्पर्धांत उतरण्यासाठी शासन आवाहन करते. पण श्रमाची वेळेची व खर्चाची तरतूद करीत नाही. शिक्षकाला, विद्यार्थ्यांना यासाठी करावा लागणारा खर्च स्वत: करावा लागतो. जरी टर्म फि मधून हा खर्च भागवावा असे शासन म्हणत असेल तरी सत्र फिसमधून इतर अन्य महत्वाच्या खर्चाच्या बाबी भागवाव्या लागत असल्यामुळे खर्च अपुरा पडतो.

[१२] खेळाची आवड वृध्दींगत होण्याच्या दृष्टीने शालान्तर्गत खेळाच्या विविध स्पर्धा आयोजित करणे, खेळ दिवस साजरे करणे, शिबीरे, सहली खेळ इत्यादी बाबींचा उपयोग फार चांगला होऊ शकतो. या संदर्भात असे आढळून आले की, अशा शाळांतर्गत व संस्थांतर्गत स्पर्धा अनुक्रमे ११ शाळा व ८ संस्था आयोजित करतात. ही परिस्थिती नाहीतरी बऱ्याचअंशी समाधानकारक आहे.

खेळदिवस "साजरा" करण्यासंबंधी शासकिय परिपत्रक असूनही शहरातील १६ शाळा पैकी केवळ ५ च शाळा खेळदिवस साजरा करतात. वास्तविक पाहता सर्व शाळांना आपापल्या त-हेने खेळदिवस साजरा करण्यास काहीच अडचण नाही. या संदर्भात सुचवावेसे वाटते की, खेळदिवस सर्व शाळांनी साजरा करावा.

[१३] जवळ जवळ सर्वच शाळा सहली काढतात. परंतु सहलीचा उपयोग खेळाच्या दृष्टीकोणातुन क्वचीतच केलेला आढळला. सहलीचा खेळांच्या दृष्टीने उपयोग करता आला पाहिजे.

[१४] वर्षातुन किमान दोनदा सर्व विद्यार्थ्यांची वैद्यकिय तपासणी करुन घेणे हे केवळ आरोग्याच्याच दृष्टीने महत्वाचे नाही तर सुदृढ व निकोप वाढ व विविध शारीरिक क्षमतांचा, कौशल्याच्या विकास होण्याच्या दृष्टीनेही महत्वाचे आहे. शाळा सुरु करण्याच्या अटीमध्ये शाळेने संस्थेचा डॉक्टर नेमावा व त्याकडुन विद्यार्थ्यांची वैद्यकिय तपासणी करुन घ्यावी अशी अट आरंभीच घातलेली असते. तथापी या पाहणीत आढळून आले आहे की शहरातील एकुण शाळेपैकी २५ % शाळा अशी वैद्यकिय तपासणी करुन घेत नाहीत. या अटीचे पालन का होत नाही, या संदर्भात शाळा खात्यातील अधिका-यांनी काळजीपूर्वक लक्ष घालून शाळांना वैद्यकिय तपासणी करुन घेणे भाग पाडावे असे सुचवावेसे वाटते.

[१५] विद्यार्थ्यांना खेळाद्वारे आपल्या अंगी असलेल्या विविध कौशल्याचा विकास करुन घेता यावा यासाठी प्रोत्साहन म्हणून खेळाडूंना फी माफी, शिष्यवृत्ती देणे, खेळाचे साहित्य पुरविणे, अथवा वह्या पुस्तके कपडे यासारखे पुरस्कार देणे योग्य ठरते. पाहणीत असे

आढळून आले की, ६ शाळा खेळाडूंना फीस माफीची सवलत देतात. तर ८ शाळा कपडे, वह्या, पुस्तके खेळाडूंना मोफत पुरवितात. ही बाब पूर्णांशाने जरी नसली तरी बऱ्याच अंशी समाधानाची आहे.

[१६] व्यवस्थापनाबरोबरच विषय शिक्षकांना त्यांच्या अध्यापनाबाबत व नियोजनाबाबत मार्गदर्शन करणे हे मुख्याध्यापकाचे कर्तव्य आहे. तथापी या सर्वेक्षणात असे आढळून आले की शहरातील १६ शाळा पैकी जवळजवळ निम्म्या शाळांचे मुख्याध्यापक शारीरिक शिक्षणाच्या शिक्षकाला त्यांच्या नियोजनाबाबत व अध्यापनाबाबत कोणत्याही प्रकारची मदत व मार्गदर्शन करीत नाहीत. कारण कदाचित संबंधीत मुख्याध्यापकांना खेळाविषयी आवड व आस्था नसणे, शारीरिक शिक्षणासंबंधी त्यांचे अज्ञान असणे अथवा शारीरिक शिक्षणाबद्दल त्यांना कमी महत्व वाटणे ही असू शकतील. कारणे कोणती का असेनात या बाबत असे सुचवावेसे वाटते की, मुख्याध्यापकांकरीता शारीरिक शिक्षणाबाबत जाणीव, जागृती व आस्था निर्माण व्हावी तसेच खेळाच्या शिक्षणाबाबत निदान प्राथमिक स्वरुपाची तरी माहिती मिळावी म्हणून उद्बोधन वर्गाचे आयोजन केले जावे.

[१७] मुलींच्या शारीरिक शिक्षणा बाबत या अहवालात यापूर्वी थोडी फार चर्चा केलेली आहेच शहरातील १६ शाळांपैकी १४ शाळा मिश्र स्वरुपाच्या आहेत. या शाळांमध्ये मुलींकरीता एकही स्त्री शिक्षिका उपलब्ध नाही. वेळापत्रकात मुलींचे खेळ घेण्यासाठी खास सोय केलेली नाही. शिवाय असे आढळून आले की शिक्षक मुलामुलींचे खेळ एकत्रही घेत नाहीत. अशा परिस्थितीत मुलींच्या शारीरिक शिक्षणाची काय स्थिती असेल हे उघड आहे. मुलींसाठी स्वतंत्र खेळ सहसा दिला जात नाही. खेळाच्या तासिकेत मुलांचे खेळ घेऊन मुलींना केवळ बघावयास लावले जाते. अथवा खेळाशिवाय अन्य काही

[अभ्यास, वाचन इ.] करण्यांस मोकळे सोडले जाते. म्हणजे मुलींचे शारीरिक शिक्षणाचे अध्यापन जवळजवळ शून्यच. यास अपवाद म्हणून फक्त १३ % शाळा मुलींसाठी वेगळा वेळ देतात. पण तोही प्रासंगीक. सामुहिक कवायतही सर्व शाळांमधून मुलामुलींची एकत्रच घेतली जाते.

या संदर्भात सुचवावेसे वाटते की, मिश्र शाळेसाठी किमान एक तरी स्त्री शिक्षिका नेमली जावी व मुलींसाठी कवायतचे वेगळे तास व खेळाचे वेगळे क्रीडा प्रकार घेतले जावेत. मुलींसाठी केवळ वेगळा वर्ग काढून चालणार नाही.

[१८] सांघिक कवायतीच्या बाबतीत सुसूत्रता यावी मुलांच्या मनामध्ये जोश व उर्मी निर्माण व्हावी मुलांना कवायतीमध्ये रस वाटावा इत्यादी कारणासाठी बॅण्ड असणे महत्वाचे आहे. पण या सर्वेक्षणात असे आढळून आले की, शहरातील २६ शाळा पैकी फक्त ७ शाळांनांच असे बॅण्ड साहित्य आहे. बॅण्ड वाजविण्यासाठी स्वतंत्र पथक कोठेही नसून शाळेतील विद्यार्थ्यांकडूनच प्रसंगी शिक्षकाकरवी शिकवून तर प्रसंगी बाहेरील व्यक्तीकडून शिकवून मुलाकडून वाद्य वाजविले जाते. याबाबीत सरावास विहीत वेळ नसल्याने वाद्ये वाजविण्यास हवे असलेले नैपुण्य विद्यार्थ्यांच्या अंगी निर्माण होत नाही. व अंतर्गत सामूहिक ताळमेळही जमत नाही.

या बाबतीत असे सुचवावेसे वाटते की, प्रत्येक शाळेस पुरेसे बॅण्ड साहित्य उपलब्ध करुन दिले गेले पाहिजे व वाद्ये वाजविण्यास शिकविण्यासाठी पूर्णवेळ जरी शक्य नसले तरी अंश कालीन बॅण्ड मास्तर अथवा ड्रील मास्तर नेमला जावा.

[१९] शारीरिक शिक्षणाच्या संदर्भात अत्यंत महत्वाची बाब म्हणजे शाळेला पुरेसे क्रीडांगण असणे. या सर्वेक्षणात भाड्याची इमारत किंवा शाळेच्या मालकीची इमारत व क्रीडांगणाची उपलब्धता यात सहसंबंध आहे असे आढळून आले. म्हणजेच ज्या शाळांना भाड्याच्या इमारती आहेत अशा ह्या शाळांना क्रीडांगण अपुरी आहेत. एका शाळेस तर क्रीडांगणच नाही.

माध्यमिक विद्यालयास इमारतीतील आवाराखेरीज किमान ३ एकर क्षेत्र क्रीडांगण म्हणून असायला हवे. शाळा सुरु करण्याच्या अटी मध्ये पुरेसे क्रीडांगणही एक प्रमुख बाब आहे. परंतु पाहणीत असे आढळून आले की, शहरातील ११ शाळांना पुरेसे क्रीडांगण नाही.

या संदर्भात नव्याने काही सूचना करण्यासारखी नाही. पण मागच्याच अटीचे [३ एकर क्षेत्राची पूर्तता] कसोसीने पालन व्हायला पाहिजे अन्यथा अशा शाळांना एकतर परवानगी देऊच नये आणि परवानगी दिली गेली असल्यास ती काढून घेण्यात यावी.

[२०] दिवसेंदिवस शारीरिक शिक्षणाच्या संकल्पनेत होणारा बदल व त्याचे वाढते क्षेत्र लक्षात घेउन खेळ साहित्यासाठी एक अथवा दोन कार्यालयवजा स्वतंत्र खोल्या असायला हव्यात. आपण शास्त्र विषयाच्या स्वतंत्र प्रयोग शाळेसाठी हट्ट धरतो व अशा प्रयोगशाळेतील कामकाजासाठी शाळेतील विद्यार्थ्यांच्या संख्येनुसार एक अथवा अधिक सहाय्यकाची मदत अपेक्षितो. पण ह्या बाबींची आवश्यकता शारीरिक शिक्षणाच्या बाबतीत आपणांस वाटत नाही ही खेदाची बाब होय. या सर्वेक्षणात ४० % शाळांनाच एक-एक खोलीचे कार्यालय उपलब्ध

असल्याचे आढळून आले. परंतु विविध क्रीडा साहित्याची देवाण घेवाण करणे ते व्यवस्थीत ठेवणे इत्यादी करीता एकाही शाळेत क्रीडा शिक्षकाच्या मदतीसाठी मदतनीस नसल्याचे आढळून आले. शिक्षकांनाच हे काम करावे लागते.

या संबंधात प्रत्येक शाळेला विद्यार्थी संख्येच्या प्रमाणात एक अथवा दोन खोल्याचे "जिमखाना" कार्यालय असावे व शिक्षकाच्या मदतीस विद्यार्थी संख्येच्या प्रमाणात एक अथवा अधिक सहाय्यक असावेत.

या संशोधनाच्या सर्व उद्दिष्टाचे म्हणजे " माध्यमिक स्तारावरील शाळांचा शारीरिक शिक्षणाच्या अडचणीचा अभ्यास करणे" हे प्रमुख सूत्र आहे. त्यामुळे सर्व अडचणींचा सारांश रुपाने विचार करुन शारीरिक शिक्षणाच्या विकासातील प्रमुख अडचणी खालील प्रमाणे मांडता येतील.

[१] अपुरे अर्थिक सहाय्य
[२] अपुरे क्रीडांगण
[३] शिक्षकाचे कामाकडील दुर्लक्ष
[४] शासकिय धोरणामधील विसंगती
[५] प्रशासकिय दुर्लक्ष इत्यादी
[६] मुलीसाठी वेगळा अभ्यासक्रम.
[७] स्त्री शारीरिक शिक्षकांच्या कमी प्रमाणात नेमणुका.